**कृपया प्रसिद्धीसाठी** **10 जुलै 2014**

## रेल्वे अपघातग्रस्तांना मिळणारी विमा रक्कम वाढविण्याची मागणी

**मुंबई, गुरुवार :** ''रेल्वे अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना मिळणा-या विमा रकमेमध्ये वाढ करण्याबाबत विचार करुन निर्णय घेण्यात येईल,'' असे आश्वासन रेल्वे मंत्री श्री. सदानंद गौडा यांनी काल नवी दिल्ली येथे भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक व उत्तर मुंबईचे खासदार श्री. गोपाळ शेट्टी यांना दिले. रेल्वे मंत्रालयासंबंधीच्या विविध मागण्या व सूचनांबाबत श्री. नाईक व श्री. शेट्टी यांनी रेल्वे मंत्र्यांशी चर्चा केली.

या चर्चेबाबत विस्ताराने माहिती देताना श्री. नाईक व श्री. शेट्टी म्हणाले,'' रेल्वे अपघातात दगावलेल्या व्यक्तिच्या कुटुंबियांना चार लाख रुपये विमा म्हणून देण्यात येतात. अन्य अपघातग्रस्तांनाही दुःखापतीनुसार विमा रक्कम मिळते. तथापि 1997 मध्ये निर्धारित केल्या गेलेल्या या दरामध्ये 16 वर्षांमध्ये एकदाही वाढ करण्यात आलेली नाही. वाढलेली महागाई लक्षात घेता या विमा रकमेतही वाढ करण्याची गरज असल्याचे आम्ही रेल्वे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर विचार करुन रक्कम वाढविण्याचे आश्वासन रेल्वे मंत्र्यांनी दिले.''

मुंबईतील रेल्वे दावा न्यायाधिकरणामध्ये वकिली करणा-या वकिलांच्या संघटनेचे विविध मागण्यांबाबतचे निवेदनही यावेळी या दोघांनी रेल्वे मंत्र्यांना सादर केले. सदर निवेदनाचा रेल्वे मंत्री तपशिलात अभ्यास करणार आहेत. तथापि, सदर निवेदनातील अत्यंत महत्त्वाच्या सूचनेकडे श्री. नाईक व श्री. शेट्टी यांनी रेल्वे मंत्र्यांचे विशेष लक्ष वेधले. गेली दोन वर्षे या न्यायाधिकरणावरील एका न्यायिक सदस्याची जागा रिक्त असून केवळ तांत्रिक सदस्यच दाव्यांबाबत निकाल देत आहे. यामुळे अपघातग्रस्तांकडे पुरेशा न्यायाच्या भूमिकेतून पाहिले जात नाही अशी तक्रार असल्याचे या दोघांनी रेल्वे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. ही नेमणूक करण्याचे आश्वासनही श्री. गौडा यांनी दिले.

श्री. राम नाईक व खासदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी मुंबई उपनगरी रेल्वे बाबतही रेल्वे मंत्र्यांशी चर्चा केली. मुंबई उपनगरी रेल्वेच्या सद्यस्थितीबाबत श्वेतपत्रिका काढण्याचा आग्रह या दोघांनी धरला. त्याबाबतही उचित कारवाई करण्याचे आश्वासन रेल्वे मंत्र्यांनी दिले.

**(कार्यालय सचिव)**